**भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय,**
**महाराष्ट्र शासन, नागपूर**

ई-मेल:- mineralblockauction@mahadgm.gov.in

दिनांक : २५/०७/२०२५

## निविदा मागणी सुचना

**"चुनखडक या खनिजांचे खनिपट्टा, कॉपर, गोल्ड असोसिएटेड विथ सिल्वर, लिड व कॉपर, कॉपर आणि असोसिएटेड मिनरल आणि लोहखनिज या खनिजांचे संयुक्त परवाना मंजूरीस्तव मागणीपत्रक"**

खाण व खनिजे (विकसन व नियमन) अधिनियम, १९५७ च्या कलम १० (ब) व कलम ११ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन आणि खनिज (लिलाव) नियम,२०१५ अंतर्गत अधिसूचित केलेनुसार महाराष्ट्र शासनाने खनिज क्षेत्र जसे चुनखडक या खनिजांचे खनिपट्टा, कॉपर, गोल्ड असोसिएटस् विथ सिल्वर, लिड व कॉपर, कॉपर व असोसिएटेड मिनरल आणि लोहखनिज या खनिजांचे संयुक्त परवाना यांची लिलावाकरिता निवड केलेली असून याद्वारे खनिपट्टा व संयुक्त परवाना मंजूरीचे हेतूने निविदा मागविण्यात येत आहे :-

अ) २ (दोन) खनिज क्षेत्रे चुनखडक करिता इलेक्ट्रानिक लिलावासाठी खनिपट्टा मंजूरीचे हेतूने निविदा मागविण्यात येत आहे.

ब) ७ (सात) खनिज क्षेत्रे [१ (एक) क्षेत्र कॉपर, १ (एक) क्षेत्र कॉपर आणि असोसिएटेड मिनरल, १ (एक) क्षेत्र कॉपर, गोल्ड असोसिएटेड विथ सिल्वर, लिड व कॉपर, व ४ (चार) क्षेत्रे लोहखनिज करिता] इलेक्ट्रानिक लिलावासाठी संयुक्त परवाना मंजूरीचे हेतूने निविदा मागविण्यात येत आहे.

खनिज क्षेत्रांची यादी खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | खनिज क्षेत्राचे नांव | खनिज | सवलतीचा प्रकार |
|---|---|---|---|
| १. | मटना लोहखनिज क्षेत्र | लोहखनिज | संयुक्त परवाना |
| २. | अंबडगांव लोहखनिज क्षेत्र | लोहखनिज | संयुक्त परवाना |
| ३. | वझारे लोहखनिज क्षेत्र | लोहखनिज | संयुक्त परवाना |
| ४. | टाले लोहखनिज क्षेत्र | लोहखनिज | संयुक्त परवाना |
| ५. | लाल हेटी कॉपर क्षेत्र | कॉपर | संयुक्त परवाना |
| ६. | भिमसेनकिल्ला गोल्ड क्षेत्र* | गोल्ड असोसिएटेड विथ सिल्वर, लिड व कॉपर | संयुक्त परवाना |
| ७. | मिरेगांव कॉपर क्षेत्र | कॉपर आणि असोसिएटेड मिनरल | संयुक्त परवाना |
| ८. | बोरी चुनखडक क्षेत्र | चुनखडक | खनिपट्टा |
| ९. | जावरा चुनखडक क्षेत्र | चुनखडक | खनिपट्टा |
| टिप :- *वरील खनिज क्षेत्रांचा लिलाव "दुसरा प्रयत्न" (Second attempt) म्हणून करण्यात येत आहे. | | | |

निविदा दस्ताऐवजाची किंमत प्रत्येक खनिज क्षेत्राकरिता रु.५,००,०००/- (रुपये पाच लक्ष फक्त) जीएसटी सह राहील. जीएसटी रिव्हर्स चार्ज मेकॅनिझमव्दारे देय राहील.

त्यानुसार वित्तीय निविदा फक्त आकडे स्वरुपात आणि तांत्रिक निविदा ही दोन्ही (हार्ड कॉपी व

सॉफ्ट कॉपी) स्वरुपात पात्र बोलीधारकाकडून मागविण्यात येत आहे.

ई-लिलावामध्ये भाग घेणेकरिता पात्रता अटी, दिनांक आणि वेळ, निविदा पत्रिकेमध्ये अंतर्भूत केलेली आहे. सविस्तर निविदा पत्रिके सोबत मुदत अवधी (कालावधी), अधिसूचना, अद्यावत सुधारणा आणि इतर सविस्तर माहिती ही खनिज क्षेत्राच्या ई-लिलाव प्रक्रियेकरिता फक्त इलेक्ट्रानिक स्वरुपात उपलब्ध आहे आणि MSTC Limited (http://mstcecommerce.com/auctionhome/mlcl/index.jsp) या संकेतस्थळावरुन डाऊन लोड करता येईल.

इच्छुक व पात्र बोलीधारक उपरोक्त संकेतस्थळावर नोंदणी करु शकतात. यशस्वी नोंदणी प्रक्रीयेनंतर पात्र बोलीधारकांना लॉगीन नोंदणी क्रमांक व पासवर्ड प्राप्त करता येईल. ई-लिलाव प्रक्रियेत भाग घेणेस्तव पासवर्ड आवश्यक राहील. नमुना निविदा दस्ताऐवज व खनिज क्षेत्राबाबत संक्षिप्त माहिती ही वरील संकेतस्थळावर मोफत उपलब्ध आहे.

लिलावाबाबत मुख्य कार्यक्रम आणि त्यांचा कालावधी खालीलप्रमाणे :-

| **कार्यक्रमाचे वर्णन** | **दिनांक** |
|---|---|
| निविदा मागणी सुचना प्रसिध्दीचा दिनांक (NIT) | **शुक्रवार, २५ जुलै, २०२५** |
| निविदा पत्रिका प्राप्त करण्याचा प्रारंभ दिनांक | **शुक्रवार, २५ जुलै, २०२५** |
| निविदापूर्व बैठक | **मंगळवार, १९ ऑगस्ट, २०२५** |
| निविदा पत्रिका खरेदी करण्याची अंतिम तारीख | **मंगळवार, ९ सप्टेंबर, २०२५** |
| तांत्रिक निविदा (Technical bid) आणि Initial Price offer सादर करण्याचा अंतिम दिनांक | **मंगळवार, १६ सप्टेंबर, २०२५** |

***Note:***

Bidders may note that for composite licences the Mineral (Auction) Amendment Rules, 2022 have dispensed with the requirement of indicating the division of the land into forest land, land owned by the State Government, and land not owned by the State Government and the requirement of demarcating the area using total station and differential global positioning system and has provided the flexibility of demarcating the concession area using global positioning system.

However, the requisite demarcation in respect of certain blocks, as and where available, may be provided as part of the information memorandum.